**MHAH220005452017**

नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०१७
रसुल रहेमान सय्य्द वि. पांडुरंग भाऊसाहेब व इतर

## आदेश
**(नि.क्र.४६ खाली)**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दाव्यात वादीने नि.क्र.२३ ला कोर्ट कमिशनरमार्फत मोजणीकामी अर्ज दिला होता, त्यानुसार नि.क्र.२८ ला कमिशन अहवाल, नकाशा अभिलेखावर दाखल आहे. त्यानुसार वादी व प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे हद्दीखुणा दाखविणेकामी दिलेल्या अर्जावरुन नि.क्र.३३ ला न्यायालयाने आदेश केला व त्यानुसार हद्दीखुणा दाखविण्यात आल्या. वादीने सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ जालिंदर पांडुरंग मोढळे यांनी दि. २/०२/२०१८ रोजी दस्त क्र. ६०७/२०१८ अन्वये विश्वास मच्छिंद्र डमरे व सचिन मच्छिंद्र डमरे यांचे नावे विकसन करारनामा लिहून दिला व त्याआधारे त्यानंतर वादीचे दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. ३ च्या सहाय्याने विश्वास मच्छिंद्र डमरे व सचिन मच्छिंद्र डमरे यांनी वादीच्या संमतीविना व अपरोक्ष कच्चे बांधकाम करुन पत्र्याचे शेड उभे केले आहे तसे नि.क्र.२८ चे मोजणी अहवाल/नकाशात व फोटोमध्ये सदर अतिक्रमण स्पष्ट दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. ३ याने दावा मिळकतीतील हॉटेलचे कच्चे बांधकाम शेड काढून घेण्याबाबत वादीने नि.क्र.३० ला दि. ०४/१२/२०२० रोजी अर्ज दाखल केला. नि.क्र३२ ला प्रतिवादीतर्फे हॉटेलशी कसलाही हितसंबंध नसल्याची पुरसिस दाखल केली. त्यामुळे नि.क्र.३३ वरील आदेशान्वये कोर्ट कमिशनर यांनी जागेवर हद्दीखुणा दाखवुन कायम केलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ नंतर विश्वास मच्छिंद्र डमरे व सचिन मच्छिंद्र डमरे यांना दाव्यात अनुक्रमे प्रतिवादी क्र. ५ व ६ म्हणुन सामाविष्ट करण्याची वादीने विनंती केली आहे. तसेच दावा कलम १ पुढे १अ नंबर देऊन

त्यामधील "पैकी दक्षिणेकडील बाजुची" हे शब्द कमी करण्याची वादीने विनंती केली आहे. तसेच दावा कलम १ नंतर १ब नंबर देऊन गट क्र. १८६/१ पैकी मिळकतीचे अर्जात नमुद केलेले वर्णन व वरील दुरुस्तीच्या अनुशंगाने इतर दुरुस्ती करण्याची परवानगी वादीने सदर अर्जात केली आहे.

४. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दिले नसल्यामुळे सदर अर्ज प्रतिवादींविरुध्द विनाम्हणणे चालविण्यात आला. प्रतिवादीचे वकील श्री. आर. जे. राऊत हजर, त्यांनी तोंडी युक्तीवादादरम्यान अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, वादीने प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावर नि.क्र.४९ यादीसोबत दाखल केलेला दस्त क्र. ६०७/२०१८ सत्यप्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३ जालिंदर पांडुरंग मोढळे यांनी विश्वास मच्छिंद्र डमरे व सचिन मच्छिंद्र डमरे यांना दावा मिळकतीत विकसन करारनामा लिहून दिला. वादीचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. ३ च्या सहाय्याने विश्वास मच्छिंद्र डमरे व सचिन मच्छिंद्र डमरे यांनी वादीच्या संमतीविना व अपरोक्ष कच्चे बांधकाम करुन पत्र्याचे शेड उभे केले आहे. त्यामुळे विश्वास मच्छिंद्र डमरे व सचिन मच्छिंद्र डमरे यांना वादपत्रात प्रतिवादीपणात सामाविष्ट करणे न्यायोचीत होईल.

६. वादीने अर्जात असे देखील कथन केले आहे की, सदर विश्वास डमरे व सचिन डमरे यांनी दावा मिळकतीत कच्चे बांधकाम करुन पत्र्याचे शेड उभे केले आहे. नि.क्र.२८ प्रमाणे कोर्ट कमिशनरमार्फत यापुर्वीच मोजणी झालेली आहे व अहवाल अभिलेखावर दाखल आहे. सदर नियोजीत प्रतिवादी यांनी वादमिळकतीत अतिक्रमण केले आहे असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ३ ने करुन दिलेल्या तथाकथित दस्त क्र. ६०७/२०१८ च्या अनुशंगाने नमुद केलेली अर्जातील दावा दुरुस्त्या सदर दाव्याचा अंतिम व गुणवत्तेवर निकाल लागणेसाठी आवश्यक असल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादी यांनी अर्जास लेखी आक्षेप नोंदवला नाही. प्रतिवादीतर्फे विधिज्ञांनी केवळ युक्तीवादादरम्यान अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. वादीने अर्जासोबत त्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती आवश्यक व गरजेची आहे असे

दिसुन येत असल्याने ते मंजुर करणे गरजेचे आहे. म्हणून मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. ५ म्हणुन विश्वास मच्छिंद्र डमरे व प्रतिवादी क्र. ६ म्हणुन सचिन मच्छिंद्र डमरे यांना वादपत्रात सामिल करण्याची वादी यांना परवानगी देण्यात येते व त्याबद्यलची दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

३) वादीने अर्जात नमुद केलेली इतर दुरुस्ती करण्याची परवानगी देखील वादीला देण्यात येते व त्याबद्दलची दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.12.12 18:18:12 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :१२/१२/२०२५.